# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क./ १७ /२०१२

**परिपत्रक :-**

विषय :- शिक्षक व शिक्षकेत्तर पदांच्या बिंदुनामावल्या अद्ययावत करुन तपासणी करुन घेण्याबाबत.

संदर्भ :- १) परिपत्रक क्र.बीसीसी/१६/७४/१९९८, दिनांक १० मार्च, १९९८.
२) परिपत्रक क्र.वि.क./७४/२००९, दिनांक २ जानेवारी, २००९.
३) परिपत्रक क्र.वि.क./ ४७८ /२००९, दिनांक ७ डिसेंबर, २००९.
४) परिपत्रक क्र.वि.क./३१२/२०१०, दिनांक ८ ऑक्टोबर, २०१०.

सर्व अध्यक्ष / सचिव / प्राचार्य / संचालक, संलग्नित अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन संस्था, औषधनिर्माणशास्त्र व तत्सम महाविद्यालये (अल्पसंख्याक महाविद्यालय वगळून) तसेच उपकुलसचिव आस्था व अध्यापक नियुक्ती विभाग यांना कळविण्यात येते की, संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर पदे भरताना शासनाने निर्गमित केलेले शासननिर्णय दिनांक २९ मार्च, १९९७ व १८ ऑक्टोबर, १९९७ मधील तरतुदीनुसार बिंदुनामावल्या अद्ययावत करुन शासन परिपत्रक दिनांक ५ नोव्हेंबर, २००९ नुसार तपासून व त्यानुसार पदे भरण्याची कार्यवाही करण्यात यावी असे आदेश संदर्भिय परिपत्रक क्र.३ नुसार निर्गमित केलेले आहेत.

तसेच संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर पदे सरळसेवा व पदोन्नतीने भरताना आरक्षणाबाबतचे निकष लावण्यासाठी विशेष कक्षाची मान्यता घेणे आवश्यक असुन शासनाच्या उपरोक्त आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे असेही कळविले आहे.

बहुतेक, संस्था महाविद्यालये, शिक्षक व शिक्षकेत्तर संवर्गातील पदे भरताना शासन निर्णय / परिपत्रक तसेच विद्यापीठ परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत काही तक्रारीही प्राप्त झालेल्या आहेत. तेव्हा, या परिपत्रकाव्दारे आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील / महाविद्यालयातील व विभागाच्या अखत्यारितील शिक्षक व शिक्षकेत्तर संवर्गातील पदे भरण्यापूर्वी आरक्षणाचे निकष लावण्यासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर पदांच्या बिंदुनामावल्या प्रत्येक वर्षी ३१ डिसेंबर पर्यंत अद्ययावत करुन शासन परिपत्रक दिनांक ५ नोव्हेंबर, २००९ मध्ये सूचित केलेल्या कार्य पध्दतीचे काटेकोरपणे पालन करुन पदे भरण्याची कार्यवाही करावी. तसेच बिंदुनामावल्या तपासण्यासाठी पाठविताना यासोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांच्या अनुशेषाबद्दलची विषयावर माहिती पाठविण्यात यावी.

आरक्षण धोरणाची अंमलबजावणी संदर्भात विद्यापीठास व शासनाच्या विविध प्राधिकरणास अहवाल / माहिती सादर करावी लागते त्यासाठी सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर संवर्गातील पदांच्या अनुशेषाची माहिती १५ दिवसांत उपकुलसचिव, विशेष कक्ष, खोली क्र.१३३, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ इमारत, मुंबई ४०० ०३२ यांना सादर करावी. तसेच, बिंदुनामावल्या तपासणीसाठी पाठविताना व जाहिरात मसुदा मान्यतेसाठी पाठविताना सदर तक्त्यामध्ये (प्रत्येक वेळी) शिक्षक व शिक्षकेत्तर पदांच्या अनुशेषाची माहिती पाठविण्यात यावी जेणे करुन अद्ययावत माहिती विद्यापीठ स्तरावर उपलब्ध होईल याची नोंद घ्यावी.

(कुमार खैरे)
कुलसचिव

दिनांक : ९ नोव्हेंबर, २०१२.
स्थळ : मुंबई - ४०० ०३२.

क्र.वि.क./ १७-अ /२०१२, दिनांक ९ नोव्हेंबर, २०१२

---

प्रति,

सर्व संस्थाचे अध्यक्ष / सचिव / प्राचार्य / संचालक, संलग्नित अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन संस्था, औषधनिर्माणशास्त्र व तत्सम महाविद्यालयाचे प्राचार्य (अल्पसंख्याक महाविद्यालय वगळून) तसेच उपकुलसचिव आस्थापना विभाग व उपकुलसचिव, अध्यापक नियुक्ती विभाग.

प्रत माहितीसाठी :-

१) मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे - १.
२) मा. संचालक, (उच्च शिक्षण) शिक्षण संचालनालय, मुंबई.
३) मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), मुंबई विभाग, मुंबई.
४) मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), कोकण विभाग, पनवेल, शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जिल्हा - रायगड - ४१० २०६.

यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी कृपया संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर पदे भरण्यासाठी बिंदुनामावल्यांची अंतिम तपासणी झाल्याशिवाय ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येवू नयेत.

(कुमार खैरे)
कुलसचिव

## Profarma 'A' (Teaching Posts)

Name & Address of the Institute / Society / Trust / Management: ______________________________

Name of the College :- 1) ______________________________ Granted / Non-Granted

Position as on- ___/___/2010.

| Sr. No | Name of the Post / Subject | No. of Sanctioned Posts | Reservation Required | | | | | Posts Filled | | | | | | Posts Vacant | | | | | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | TEACHING Posts | | SC | ST | DT/NT (ABCD) | OBC | SBC | OPEN | SC | ST | DT/NT (ABCD) | OBC | SBC | SC | ST | DT/NT (ABCD) | OBC | SBC | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |

Date :-

Seal : ______________

Principal

## Profarma 'B' ( Non- Teaching Posts)

Name & Address of the Institute / Society / Trust / Management: ____________________

Name of the College :- 1) ____________________ Granted / Non-Granted

Position as on- __ / __ /2010.

| Sr. No | Name of the Post | No. of Sanctioned Posts | Reservation Required | | | | | | Posts Filled | | | | | Posts Vacant | | | | | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | NON - TEACHING | | SC | ST | DT/NT (ABCD) | OBC | SBC | OPEN | SC | ST | DT/NT (ABCD) | OBC | SBC | SC | ST | DT/NT (ABCD) | OBC | SBC | |
| 1 | Registrar | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 2 | Superintendent | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 3 | Head Clerk | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 4 | Sr. Clerk | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 5. | Jr. Clerk | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 6. | Library Clerk | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 7. | Lab. Asstt. | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 8. | Lab. Attendant | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 9. | Library Attendant | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 10. | Steno | | | | | | | | | | | | | | | | | | |
| 11. | Peon | | | | | | | | | | | | | | | | | | |

Date :-

Seal : ____________

Principal